# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 400/2022 दिनांक : 16.10.2022

## 1)घरफोडी :–

**1)हिमायतनगर :–** दिनांक 15.10.2022 रोजी 01.00 वा. ते 06.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी मौजे एकंबा ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व साक्षीदार आपले घरातील एका रुममध्ये झोपले असता बाजुचे रुमचे दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश करुन स्टीलचे डब्यात ठेवलेले सोन्या चांदीचे दागीने एकुण किंमती 1,22,900/–रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला आहे. वगैरे **फिर्यादी प्रल्हाद शिवराम आंडगे, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा. एकंबा ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरन 231/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री महाजन, मो.क्रं. 9689707038** हे करीत आहेत.

**2)मुक्रमाबाद :–** दिनांक 12.10.2022 रोजी 20.00 वा. ते दिनांक 14.10.2022 रोजी 10.30 वा. चे दरम्यान, **धर्मा नगर तांडा जिल्हा परीषद शाळा ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील धर्मा नगर तांडा केंद्र बाऱ्हाळी जिल्हा परीषद शाळेचे व अंगनवाडी शाळेचे कुलूप तोडून आत प्रवेश करुन आतील टि.व्ही., विद्यार्थ्यांना जेवण बनवीण्याचे साहित्य, एकुण किंमती 42,500/–रूपयाचा माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला आहे. वगैरे **फिर्यादी प्रकाश ठाकूर चव्हाण, वय 40 वर्षे, व्यवसाय मुख्याध्यापक धर्मा नगर तांडा केंद्र बाऱ्हाळी जिल्हा परीषद शाळा ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रमाबाद** गुरन 241/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2319 सिध्देश्वर, मो.क्रं. 8999881900** हे करीत आहेत.

## 2)कलम 380 चोरी :–

**विमानतळ :–**दिनांक 14.10.2022 रोजी 23.00 वा. ते दिनांक 15.10.2022 रोजी 06.00 वा. चे दरम्यान, **महेबुबनगर येथील उघडया टिन पत्राचेशेडमधुन, नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे उघडया टिन पत्राचे शेडच्या घरामध्ये खिळयाला अडकवून ठेवलेल्या बॅग मधील आधार कार्ड, मतदान कार्ड, राशन कार्ड, टि.सी., व इतर शैक्षणिक कागदपत्र व मुलीची कॉलेजची फिस भरण्यासाठी बी.सी. चे उचलेले नगदी 24,000/–रुपये असा माल बॅगसहित कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी शेख ईस्माईल शेख मन्जूर, वय 45 व्यवसाय ॲटोचालक रा. महेबुबनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 352/2022 कलम 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री लोखंडे, मो.क्र. 9527810006** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :–

**1)वजिराबाद :–** दिनांक 29.09.2022 रोजी 15.00 वा. ते 15.30 वा. चे दरम्यान, **हनुमान ट्रान्सपोर्ट मुरमुरा गल्ली, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची स्पेलंडर प्लस कंपणीची मो. सा. क्रं एमएच–26/एस–4788 किंमती 15,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी सुभाष धोंडीबा कोल्हे, 30 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. भाहेगाव, ता.जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 365/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/412 कानगुलवार, मो.क्रं. 8329585283** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :–** दिनांक 12.10.2022 रोजी 12.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहते घर काबरा नगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो स्पेलंडर प्लस कंपणीची मो. सा. क्रं एमएच–26/एजी–2170 किंमती 40,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी संभाजी गणेशराव वडजे, 44 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. काबरानगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 372/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/51 जाधव, मो.क्रं. 90679552076** हे करीत आहेत.

**3)भाग्यनगर :–** दिनांक 08.10.2022 रोजी 03.40 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहते घर माणीक नगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो कंपणीची मो. सा. क्रं एमएच–26/यु–4725 किंमती 10,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी राजाराम शावजी देशमुख, 68 वर्षे, व्यवसाय शेती रा. माणीकनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 373/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/81 बंडेवार, मो.क्रं. 9923103778** हे करीत आहेत.

## 4)चोरी :–

**1)अर्धापूर** :–दिनांक 15.10.2022 रोजी 14.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे आखाडयाजवळ उमरी ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे शेतातील अर्धे पोते सोयाबीनचे अंदाजे वजन 30 किलो किंमती 2,000/–रूपयाचे यातील नमुद चोरटयाने पोत्यात भरुन त्यांची मो.सा. क्रं. एम.एच./26–एस–4768 वर चोरुन घेवून जात असताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी मुंजाजी मारोतराव गुंडले, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. उमरी ता. अर्धापूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 290/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1279 चव्हाण, मो.क्रं. 9356283717** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद** :–दिनांक 13.10.2022 रोजी 17.00 वा. ते 17.30 वा. चे दरम्यान, **बसस्थानक, नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा सॅमसंग गॅलक्सी कंपनीचा मोबाईल किंमती 7000/–रुपयाचा व आईच्या गळयातील मंगळसुत्र किंमती 20,000/–रुपयाचे असा एकुण 27,000/–रुपयाचा माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी विठ्ठल शंकरराव वानखेडे, वय 34 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. वरवट ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 366/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1012 राठोड, मो.क्रं. 9970757740** हे करीत आहेत.

## 5)जनावर चोरी :–

**मुखेड** :–दिनांक 09.10.2022 रोजी 19.00 वा. ते दिनांक 10.10.2022 रोजी चे दरम्यान, **फिर्यादीचे शेतात मौजे वर्ताळा ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे दोन बैल किंमती 1,15,000/– रुपयाचे कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी एकनाथ विठ्ठल डावखुरे वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. वर्ताळा ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 306/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/1265 गिते, मो. क्र. 8805957400** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :–

**शिवाजीनगर** :– दिनांक 30.12.2021 रोजी 20.00 वा. ते 15.10.2022 रोजी 20.00 वा. चे दरम्यान, **जयभीमनगर नांदेड ह.मु. आंबेडकरनगर, नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस कापड दुकान टाकण्यासाठी माहेरहुन एक लाख रुपये घेवून ये म्हणुन शिवीगाळ करुन मारहाण केली व तिचा शारिरिक व मानसिक छळ केला. वगैरे **फिर्यादी 19 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 381/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/131 मुंढे, मो.क्रं. 9923595438** हे करीत आहेत.

## 7)अपघात :–

**कुंटूर** :– दिनांक 11.10.2022 रोजी 20.00 वा. चे सुमारास, **मौजे कुष्णूर नांदेड ते नायगाव हायवे रोडवर ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे श्रीनिवास मुरलीधर काशेटवार वय 50 वर्षे रा. कहाळा बु. ता. नायगाव जि. नांदेड** यांना यातील नुमद आरोपी मो.सा. क्र. एम.एच./26–बी.व्ही.–6018 चा चालकाने त्याचे ताब्यातील मो.सा. हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन मयत यांचे इलेक्ट्रीक स्कुटीला पाठीमागुन जोराची धडक मारुन त्यांचे मरणास कारणीभूत झाला व स्वतःची मो.सा. घेवून पळुन गेला. वगैरे **फिर्यादी नामदेव जनार्दन गादेवार वय 43 वर्षे व्यवसाय व्यापार रा. मरवाळी ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं. 169/2022 कलम 279,304(अ) भादवी सह कलम 134/177 मो. वा.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री अटकोरे, मो.क्र. 8669182128** हे करीत आहेत.

## 8)गळफास घेवुन मृत्यु :–

**नायगाव** :–दिनांक 15.10.2022 रोजी 13.30 वा. ते 14.00 वा. चे दरम्यान, **स्वतःचे घरी मौजे नरंगल ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे प्रदीप मुकुंद पटेकर, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा. नरंगल ता. नायगाव जि. नांदेड,** यांनी सतत नापीकी होत असल्याने व संसार चालविणे अवघड होत असल्याने ते सतत विचारात राहत होते व शेतीवर कर्ज कसे फेडावे म्हणुन त्यांनी गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार शिवाजी मुकुंद पटेकर, वय 28 वर्षे, व्यवसाय शेती रा. नरंगल ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे नायगाव** आ. मृ. 38/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री आनंदा किशन वाघमारे, मो.नं. 9096618261** हे करीत आहेत.

## 9)विज पडुन मृत्यु :—

**रामतीर्थ** :—दिनांक 14.10.2022 रोजी 16.30 वा. चे सुमारास, **मौजे चिटमोगरा खंडोबा मंदिराजवळ रस्त्यावर चिटमोगरा ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे हुलूबाई लक्ष्मण काळेकर, वय 50** वर्षे, **रा. चिटमोगरा ता. बिलोली जि. नांदेड**, ही शेतात काम करुन घराकडे येत असताना अचानक अंगावर विज पडून जागीच मरण पावली. वगैरे **खबर देणार विजय रामराव काळेकर, वय 30** वर्षे, **व्यवसाय शेती रा. चिटमोगरा ता. बिलोली जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे रामतीर्थ** आ. मृ. **27**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1371 शिंदे, मो.नं. 9552524548** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड